ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना

रविवार, दि. १७ मे २००९

अमित पवार

## तेजाची उपासना म्हणजे अग्निहोत्र. सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी विशिष्ट मंत्रोच्चाराने केला जाणारा यज्ञ म्हणजे अग्निहोत्र.

पृथ्वीच्या तापमानात होणारी वाढ आणि प्रदूषण यामुळे मानवजातच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीच धोक्यात आली आहे. सर्वत्र पूर, दुष्काळ, उष्ण वादळे यांची तीव्रता आणि प्रमाण यात वाढ झाल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडू लागले आहे. या परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे आपल्याच हातात आहे. ही परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी अग्निहोत्राची उपासना हा सर्वांत सोपा आणि साधा उपाय आहे. अग्नीची उपासना करणे ही हिंदुस्थानची प्राचीन परंपरा आहे. वेदात अग्निहोत्राचा उल्लेख करण्यात आला आहे. अग्नीची उपासना म्हणजे अग्निहोत्र. तेजाची उपासना म्हणजे अग्निहोत्र. सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी विशिष्ट मंत्रोच्चाराने केला जाणारा यज्ञ म्हणजे अग्निहोत्र. सर्व धर्मातील स्त्री-पुरुष घरच्या घरीदेखील ही अग्नी उपासना करू शकतात. यासाठी धर्म, जात, पंथ याची बंधने आड येत नाहीत. मानव, निसर्ग आणि ईश्वर यांना एकरूप करणारा मार्ग म्हणजेच वेदात सांगितलेला अग्निहोत्र. दान, तप, कर्म, स्वाध्याय हा पंचसाधन मार्ग असे म्हटले जाते. या उपासनेमुळे आपले आरोग्य आणि भोवतालचा परिसर यांची अंतर्बाह्य शुद्धी होते. यावेळी होणाऱ्या मंत्रोच्चाराने वातावरणात एक विशिष्ट नाद उमटतो. त्यामुळे वातावरणात एक प्रकारचा आध्यात्मिक प्रभाव जाणवतो. तसेच बुद्धीला चालनादेखील प्राप्त होते. आजच्या व्यस्त आणि धकाधकीच्या जीवनात ही उपासना करणे सर्वांना सोयीस्कर व्हावे यासाठी अक्कलकोटच्या स्वामी समर्थ यांनी या उपासनेचा मार्ग सुचविला आहे. या मार्गाने आपण शारीरिक आणि मानसिक व्याधींवर मात करू शकतो. समाजात उपभोग घेण्याची वृत्ती, भ्रष्टाचार, हिंसाचार बोकाळला आहे. कुटुंबव्यवस्था धोक्यात आली आहे. यावर अग्निहोत्र हा उत्तम उपाय आहे.

हिंदुस्थानातच नव्हे तर अर्जेंटिना, ब्राझिल, पेरू, चिली यासारख्या लॅटीन अमेरिकन राष्ट्रांत तसेच युरोपमधील जर्मनी, स्पेन, पोलंड अशा ६५ ते ७० देशांमध्ये अग्निहोत्र करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अग्निहोत्रासाठी सूर्योदयापूर्वी पाच-दहा मिनिटे अगोदर कुंडासारख्या (पिरॅमिड) आकाराच्या तांब्याच्या भांड्यात तळाशी गाईच्या शेणाच्या वाळलेल्या गोवऱ्या एकावर एक रचल्या जातात. कापूर गुग्गुळाच्या सहाय्याने अग्नी प्रज्वलीत केला जातो. तांबे हा धातू विद्युत वाहक आहे. या भांड्याच्या विशिष्ट आकारामुळे त्याभोवती




अग्निहोत्राच्या वेळी सूक्ष्म अशी, विद्युत चुंबकीय ऊर्जा गोळा होते. त्यामुळे वातावरणाला पोषक अशी ऊर्जा निर्माण होते. वरोवर सूर्योदयाच्या वेळी

**सूर्याय स्वाहा सूर्याय इदं न मम**
**प्रजापतये स्वाहा प्रजापतये**
**इदं न मम**

आणि सूर्यास्ताच्या वेळी

**अग्नेय स्वाहा अग्नेय इदं न मम**
**प्रजापतये स्वाहा प्रजापतये**
**इदं न मम**

हा मंत्र म्हणून दोन चिमूटभर अखंड तांदूळ आणि गाईचे तूप यांची आहुती अग्नीला दिली जाते. ज्यावर कमी रासायनिक प्रक्रिया झाली आहे असे अखंड तांदूळ वापरणे जास्त फलदायी ठरते. याचे भस्म जास्त गुणकारी असते. गाईच्या तुपात औषधी गुणधर्म असल्यामुळे वातावरणातील सूक्ष्म जंतूंचा नाश होतो. किरणोत्सर्गाचा घातक परिणाम नियंत्रणात ठेवण्यासाठीसुद्धा ते उपयुक्त ठरते. होमकुंडात तांदूळ व तुपाची आहुती दिल्यानंतर काही मिनिटे ध्यानधारणा केली जाते. सूर्योदयाच्या आणि सूर्यास्ताच्या वेळी केलेल्या अग्निहोत्राची राख काढून घेतल्यानंतर ती माती, लाकूड, काच किंवा तांब्याच्या भांड्यात ठेवली जाते. हे भस्म काढून घेतल्यानंतर पुन्हा याच पद्धतीने अग्निहोत्र उपासना केली जाते. ही राख पाण्यात मिसळून ते पाणी प्राशन केल्यास शरीरातील पेशी शुद्ध होतात. या राखेद्वारे शेतकरी आपल्या जमिनीचा कस वाढवून भरघोस आणि दर्जेदार उत्पादन घेऊ शकतो. त्यामुळे कृषिक्षेत्रातही अग्निहोत्रामुळे चांगले बदल घडू शकतात. हे आता संशोधनाअंती सिद्ध झाले आहे. अग्निहोत्रामुळे मानसिक तणाव, चिंता दूर होतात. त्वचारोग, तीव्र डोकेदुखी, घशातील गाठींना येणारी सूज (टॉन्सिलीटीस), जठराचा आजार (ॲसिडिटी), स्त्रीचे शारीरिक आजार, किडनीचा आजार यासारख्या व्याधींवर अग्निहोत्राची रक्षा एक चांगला उपाय असल्याचा दावा संशोधकांनी केला आहे. भू, जल, वायू यांची शुद्धी अग्निहोत्रामुळे होते. आपल्याला सुखी आणि समृद्ध जीवनावरोबरच आध्यात्मिक आणि मूल्यात्मक आयुष्य जगायचे असेल तर अग्निहोत्राची उपासना करावीच लागेल.